



दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक १४२ ●शुक्रवार, दि. २२ ऑगस्ट २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955


## पीक कर्जाच्या विवंचनेतून तरुण शेतकऱ्याची आत्महत्या



केज । प्रतिनिधी

वडिलांच्या नावे असलेले पीक कर्ज कसे फेडायचे या चिंतेतून नैराश्य आलेल्या अजय बापूराव थोरात (वय २९, रा. चिंचोली माळी, ता. केज) या तरुण शेतकऱ्याने गुरुवारी सकाळी १० वाजता राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली.

थोरात यांच्या वडिलांच्या नावे दोन एकर शेती असून त्यावरून महाराष्ट्र ग्रामीण बँकेकडून दीड लाख रुपयांचे पीक कर्ज घेण्यात आले होते. पेरणीनंतर पावसाने घेतलेली ओढ आणि मागील काही दिवसांपासूनच्या अतिवृष्टीमुळे पिकांचे मोठे नुकसान झाले. त्याम ुळे घेतलेले कर्ज कसे फेडायचे या विवंचनेत अजय थोरात नैराश्यात गेला होता.

नैराश्यातून त्याने घरातील लोखंडी आडूला साडीच्या सहाय्याने गळफास घेऊन जीवन संपवले. घटनेची माहिती मिळताच पोलीस उपनिरीक्षक सुकुमार उर्फ राकेश बनसोडे व बिट जमादार बाबासाहेब बांगर यांनी घटनास्थळी धाव घेऊन मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पाठवला.

## प्रेम प्रकरणातून २६ वर्षीय तरुणाचा जीव घेतला; परळीत खळबळ, आरोपी पसार

बीड । प्रतिनिधी

परळी तालुक्यातील जळगव्हाण भागातील रत्ननगर तांडा येथे उशीरा रात्री घडलेल्या एका धक्कादायक घटनेने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. गावातील भीमराव शिवाजी राठोड (वय अंदाजे २६) या तरुणाची प्रेम प्रकरणातून झालेल्या वादातून निर्घृण हत्या करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी अनिल बाबासाहेब चव्हाण याच्याशी मयत भीमराव राठोड यांचा काही काळापासून कौटुंबिक आणि वैयक्तिक वाद सुरू होता. या वादाच्या मुळाशी एका प्रेम प्रकरणाचा संदर्भ असल्याचे प्राथमिक चौकशीत उघड झाले आहे. अनेक वेळा दोघांमध्ये बाचाबाची झाली होती. मात्र काल संध्याकाळी अनिल चव्हाण याने भीमरावला रत्ननगर तांडा येथे बोलावून घेतले. यावेळी पुन्हा जुनाच वाद उफाळून आला आणि दोघांमध्ये जोरदार वादावादी झाली. वाद वाढताच हाणामारी झाली आणि रागाच्या भरात अनिलने जवळच असलेला कोयता उचलून भीमरावच्या डोक्यावर वार केला. वार एवढे जबरदस्त होते की भीमराव गंभीर जखमी होऊन



जागीच कोसळला. घटनास्थळी उपस्थित असलेल्या काही नागरिकांनी मदतीचा प्रयत्न केला, मात्र तोपर्यंत भीमरावचा मृत्यू झाला होता. खुनानंतर आरोपी अनिल चव्हाण तिथून फरार झाला असून त्याचा शोध घेण्यासाठी पोलिसांचे पथक विविध ठिकाणी रवाना झाले आहे.

घटनेची माहिती मिळताच सिरसाळा पोलीस ठाण्याचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला. दरम्यान, या हत्येमुळे संपूर्ण रत्ननगर तांडा परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असून गावात पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला आहे. या प्रकरणी सिरसाळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीला ताब्यात घेण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. पोलिस निरीक्षकांनी सांगितले की, हा खून प्रेम प्रकरणातून झालेला असल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. पुढील तपास सुरू असून आरोपीला लवकरच अटक करण्यात येईल, असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे.

## मराठा मोर्चासाठी येणाऱ्या वाहनांना टोलमाफी द्या; खा.सोनवणे भेटले गडकरींना

### मराठा समाजाच्या मोर्चासाठी दिले MSRDC आणि NHAI ला पत्र

बीड । प्रतिनिधी

मराठा समाजाला आरक्षण मिळावे, यासाठी मनोज जरांगे पाटील यांच्या मुंबई मोर्चा निमि त्त बीड जिल्ह्यासह राज्यभरातून मुंबईकडे लाखो वाहने येणार आहेत. या वाहनांमधून युवक, शेतकरी, कष्टकरी येणार असून त्यांच्यावर आर्थीक भार पडू नये, यासाठी त्यांच्या वाहनांना टोल माफी देण्यात यावी, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी ▶▶ उर्वरित पान २ वर



**समाजासाठी पत्र देणारे पहिले लोकप्रतिनिधी**

**राज्यात मराठा आरक्षण प्रश्नी वातावरण तापलेले आहे. दि. २९ ऑगस्ट रोजी मुंबई येथे मनोज जरांगे पाटील यांचे आंदोलन होत आहे. यासाठी ग्रामीण भागातून येणाऱ्या गरीब मराठा सम ाजावर आर्थीक भार पडू नये, यासाठी टोलमाफीचे पहिले पत्र केंद्रीय मंत्री तसेच चडठऊ व छकख यांना दिले आहे. असे पत्र देणारे खा. बजरंग सोनवणे हे पहिले लोकप्रतिनिधी आहेत.**

## बीडमध्ये बेपत्ता होमगार्ड महिलेचा मृतदेह आढळला नाल्यात, परिसरात खळबळ

बीड । प्रतिनिधी

शहरातील शिवाजीनगर पोलीस ठाणे हद्दीत एका होमगार्ड महिलेचा मृतदेह आढळल्याने खळबळ उडाली आहे. आयोध्या राहुल व्हरकटे असे मयत महिलेचे नाव असून त्या गेवराई येथे होमगार्ड म्हणून कार्यरत होत्या. चार दिवसांपूर्वी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात आयोध्या बेपत्ता असल्याची तक्रार नोंदविण्यात आली होती. आणि आज दुपारच्या सुमारास त्यांचा मृतदेह एका नाल्यात आढळून आला. ही हत्या



की आत्महत्या? याचा तपास पोलीस करत आहेत. मात्र एका होमगार्ड महिलेचा मृतदेह आढळून आल्यानं परिसरात खळबळ उडाली आहे.

## मनोरंजनाच्या क्लब वर रोज लाखोंची उलाढाल; यंत्रणा गप्पगार...

### धर्मदाय आयुक्त कार्यालयाचे नियम काय हे कोणालाच माहीत नाहीत, स्थानिक यंत्रणाची हाताची घडी तोंडावर बोट

तलवाडा । प्रतिनिधी

पोलिस अधीक्षक नवनीत कावत यांनी जिल्ह्यात अवैध धंद्यांना आळा घातल्या नंतर पोलिस विभागातील अधिकाऱ्या समवेत अनेक कार्यालयातील अधिकारी आणि कर्मचारी यांचे बाहेरून येणारे इनकम बंद झाले होते , परंतु आता जिल्ह्यात सरपंच प्रकरण थोडे थंडावले असल्याने आता पोलिस अधीक्षक यांच्या माघारी अनेक पोलिस ठाणे हद्दीत स्थानिक ▶▶ उर्वरित पान २ वर

**● पोलिस दलाची नशामुक्त मोहीम यशस्वी होईल का ?**

**एकीकडे जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक यांनी नाहामुक्त बीड करण्यासाठी मोहीम राबवली असून याला सर्व स्तरातून प्रतिसाद देत पोलिस दलाचे अभिनंदन होत आहे. तर एकीकडे तलवाडा सारख्या महत्वाच्या गावात म नोरंजनार्थ चालवण्यात येणाऱ्या क्लब वर गुटखा, तंबाखू, सिगारेट, दारू हे पुरवण्यात येत आहे ही बाबत तलवाडा पोलिस स्टेशन चे अधिकारी आणि कर्मचारी यांना पत्रकार यांनी वेळोवेळी सांगितली आहे. परंतु त्यांच्याकडून कोणतीच कार्यवाही झाली नसल्याने ही मोहीम यशस्वी होईल की नाही हा प्रश्न उपस्थित होत आहे.**

## प्रत्यक्ष पाणी मेहकरी धरणात पोहोचताच परिसरातील ग्रामस्थ व शेतकऱ्यांकडून जलपूजन, आ.धस यांचे मानले आभार

### शेतकऱ्यांचे हित साधण्यासाठी केलेल्या या प्रयत्नाने समाधान: आ.सुरेश धस

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी मतदारसंघातील शेतकऱ्यांसाठी दिलासादायक बातमी समोर येताना दिसत आहे. आमदार सुरेश धस यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे मेहकरी मध्यम प्रकल्पात पाणी सोडण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला असून आज सकाळी ९.४५ वा.सीना मध्यम ▶▶ उर्वरित पान २ वर



**● या पाण्यामुळे मेहकरी धरणाच्या पाणीसाठ्यात वाढ होईल आणि स्थानिक शेतकऱ्यांना सिंचनासाठी मोठा दिलासा मिळेल. शेतकऱ्यांचे हित साधण्यासाठी केलेल्या या प्रयत्नाचे समाधान मला आहे. समाजाप्रती असलेली जबाबदारी लक्षात घेऊन शेतकऱ्यांच्या हिताच्या प्रत्येक प्रश्नावर मी सातत्याने ठामपणे उभा आहे. मी मतदार संघातील शेतकऱ्याच्या प्रत्येक प्रश्नासाठी कटिबद्ध असल्याचे यावेळी बोलताना आमदार सुरेश धस यांनी सांगितले.**

## केज मतदार संघातील दोन सबस्टेशनसाठी अतिरिक्त पॉवर ट्रान्सफॉर्मर मंजूर

### आ. नमिता मुंदडा यांच्या प्रयत्नांना यश ; पाच सबस्टेशनची क्षमताही झाली दुप्पट

अंबाजोगाई । प्रतिनिधी

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेअंतर्गत केज मतदार संघातील शेतकऱ्यांना दिवसा अखंडित वीजपुरवठा होण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. आ. नमिता मुंदडा यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना यश मि ळत आपेगाव आणि साळेगाव या सबस्टेशनसाठी प्रत्येकी ५ एमव्हीए क्षमतेचे अतिरिक्त पॉवर ट्रान्सफॉर्मर मंजूर झाले आहेत.

याशिवाय चिंचोली माळी, आडस, येळंब घाट, बनसारोळा आणि धनेगाव या सबस्टेशनची क्षमता ▶▶ उर्वरित पान २ वर



**● ट्रान्सफॉर्मर कार्यान्वित होण्यासाठी प्रयत्न सुरू**

**आपेगाव, साळेगाव व इतर सबस्टेशनसाठी मंजूर झालेले पॉवर ट्रान्सफॉर्मर लवकरात लवकर उपलब्ध व्हावेत आणि प्रत्यक्षात कार्यान्वित व्हावेत, यासाठी माझे प्रयत्न सुरू आहेत. –आ. नमिता मुंदडा**

## पतसंस्थांच्या घोटाळ्यात अडकलेल्या ठेवीदारांना मिळणार न्याय

### आ.प्रकाश सोळंके यांच्या अथक प्रयत्नांना अखेर यश ; अमित शहा यांची महत्त्वाची घोषणा



माजलगाव । प्रतिनिधी

जिजाऊ, ज्ञानराधा, शुभ कल्याण, जिजामाता आणि राजस्थानी या बहुराज्यीय पतसंस्थांमध्ये झालेल्या मोठ्या घोटाळ्यामुळे हजारो ठेवीदारांचे कोट्यवधी रुपयांचे पैसे अडकून पडले होते. ▶▶ उर्वरित पान २

## आम आदमी पार्टीचे जि. प समोर झोपा काढा आंदोलन

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यामध्ये जिल्हा परिषदेच्या शाळांची दुरवस्था सुधारण्यासाठी आणि त्यांना आवश्यक मूलभूत सुविधा पुरवण्यासाठी आम आदमी पार्टी (आप) ने 'झोप काढू' आंदोलन करण्यात आले. महाराष्ट्र प्रदेश सचिव सुग्रीव मुंडे महाराष्ट्र सचिव या आंदोलनास आवर्जून उपस्थित राहिले व माजी सैनिक अशोक येडे, जे 'आप'चे जिल्हाध्यक्ष , यांच्या नेतृत्वाखाली ▶ उर्वरित पान २



## ज्येष्ठ पत्रकार सर्वोत्तम गावरस्कर यांचा नागरी सत्कार

### सत्काराला उपस्थित राहण्याचे मराठी पत्रकार परिषदेच्या पदाधिकाऱ्यांचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्याचे सुपुत्र ज्येष्ठ संपादक सर्वोत्तम गावरस्कर अण्णा यांना मराठी पत्रकार परिषदेचा नागोजीराव दुधगावकर स्मृती राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. याबद्दल त्यांचा भव्य नागरी सत्कार रविवार दिनांक २४ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता जालना रोडवरील हॉटेल अन्वीता येथे पद्मश्री डॉ.






तात्यासाहेब लहाने यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम. देशमुख हे राहणार असून प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर यांच्यासह सर्व सन्माननीय संपादक उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन ▶▶ उर्वरित पान २ वर

# राज्याच्या केंद्रस्थानी पुन्हा मुंडे , दमानिया आमने– सामने !

● कृषी घोटाळ्याची फाईल मुंडे यांनी गायब केली असल्याचा आरोप !
● कृषी सचिव व्ही. राधा यांनी मंत्र्यांना कृषी विभागातल्या भ्रष्टाचाराची फाइल पाठवली !
● फाईल दाबण्यात आली ;
● चौकशीची पुन्हा मागणी !

बीड । प्रतिनिधी

कृषी मंत्री असताना धनंजय मुंडे यांच्या कार्यकाळात कृषी वस्तूंची झालेली खरेदी ही तिप्पट दराने केली असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केला होता. या प्रकरणातील महत्त्वाची फाईल धनंजय मुंडे यांनी गायब केला असल्याचा आरोप अंजली दमानिया यांनी केला असून राज्यात पुन्हा धनंजय मुंडे यांच्या विरोधात अंजली दमानिया आक्रमक




झाल्या असल्याचे दिसत आहे.

माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्या विरोधात सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया पुन्हा आक्रमक झाले असून कृषी विभागाचे सचिव वी राधा यांनी कृषी विभागातल्या भ्रष्टाचाराच्या फाईल धनंजय मुंडे यांनी गायब केला असल्याचा आरोप अंजली दमानिया यांनी केला असून कृषी विभागाच्या भ्रष्टाचार प्रकरणी अंजली दमानिया पुन्हा आक्रमक झाल्या असून ▶▶ उर्वरित पान २ वर




# पोळा सण: बैलांच्या ऋणानुबंधांचा कृतज्ञतेचा महोत्सव

भारतीय संस्कृतीत सण हे केवळ आनंदाचे निमित्त नसतात , तर ते आपल्या जीवनशैलीशी , निसर्गाशी आणि संस्कृतीशी असलेल्या नात्यांची जाणीव करून देतात . अशा अनेक सणांपैकी पोळा हा एक असा सण आहे, जो आपल्या कृषीसंस्कृतीतील बैल या अत्यंत महत्त्वाच्या जीवावर केंद्रित आहे . पोळा म्हणजेच बैलपोळा – श्रावण महिन्यातील पिठोरी अमावास्येला साजरा होणारा सण – हा शेतकरी आणि बैल यांच्यातील ऋणानुबंधाचे प्रतिक आहे . वर्षभर न थकता शेतकऱ्याच्या शेतीसाठी राबणाऱ्या बैलांना कृतज्ञतेने नमविण्याचा आणि त्यांचा सन्मान करण्याचा हा दिवस असतो .

भारतात पोळा महाराष्ट्र , मध्य प्रदेश , छत्तीसगड , कर्नाटक या राज्यांत साजरा केला जातो . महाराष्ट्रात विशेषतः विदर्भ , मराठवाडा आणि खान्देश भागात या सणाला मोठं महत्त्व आहे. या दिवशी बैलांना आंघोळ घालून , त्यांच्या अंगाला हळद , तेल लावून, रंगीत रंगांनी सजवले जाते . गळ्यात माळा , घंटा , कवड्या , आणि पायात चांदीचे तोडे घातले जातात . शिंगांना रंग लावून ते उठून दिसतील अशी सजावट केली जाते . बैलांना जेवायला गोडधोड अन्न दिलं जात . संध्याकाळी गावातून बैलांची मिरवणूक काढली जाते . शेतकरी पारंपरिक वेशात , ढोल–ताशा , बॅन्ड , लेझीम यांच्या गजरात आपल्या बैलांसह



सामील होतात . या मिरवणुकीत बैलांच्या सौंदर्यस्पर्धाही घेतल्या जातात .पोळ्याच्या आदल्या दिवसापासूनच तयारी सुरू होते . शेतकरी बैलांची साधने जसे की जू , सोंटा , नांगर झाडून–पुसून रंगवतात . महिलावर्ग घरातील सजावट करतो . विशेष पारंपरिक जेवण बनवलं जात , ज्यात पुरणपोळी , कांदाभजी , खिचडी , शेवया इत्यादी पदार्थ असतात . मुलांसाठी हा दिवस खास असतो – कारण अनेक घरांत लहान मुलांना लाकडी बैलाचे खेळणे दिले जाते . ‘ तन्हा पोळा ’ म्हणून दुसऱ्या दिवशी मुले हे खेळणे सजवून गावभर घेऊन फिरतात . पोळा सणाचे पुराणकाळापासून महत्त्व आहे . श्रीकृष्णाच्या गवळणारी जीवनशैलीत गोधनाचे महत्त्व अधोरेखित झाले आहे . बैल हे केवळ शेतीचे सहकारी नव्हे, तर ते जीवनशैलीचे अविभाज्य घटक होते . त्यामुळे पोळा हा फक्त सण नसून , एक प्रकारचा बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा सांस्कृतिक दिन आहे . पूर्वीच्या काळी यंत्रांचा अभाव होता , तेव्हा शेतीतील सर्व कामं बैलांवर अवलंबून होती . नांगरणीपासून वाहतुकीपर्यंत प्रत्येक टप्प्यावर बैलांचे योगदान अमूल्य होते . आजही काही भागांत ते तितक्याच श्रद्धेने वापरले जातात .

सणाच्या दिवशी बैलांची पूजा केली जाते आणि विशेष मंत्र म्हणत बैलाला ओवाळले जाते . ‘बैल माझा चांगला , मळ्यात नांगरतो ; पोळ्याला येता , माझं मन हरखतो ! ’ अशा ओव्या गात गात बायका त्यांच्या कृतज्ञतेचे शब्द व्यक्त करतात . बैलांच्या गळ्यात लावलेल्या घंटा , पायातील तोडे , आणि मिरवणुकीतील ढोल–ताशांचे आवाज संपूर्ण गावात सणाचा आनंद निर्माण करतात . लोक एकमेकांच्या घरी जातात , एकत्र जेवतात , आणि बैलांच्या गोष्टी सांगतात . पोळा सण गावकरी , शेतकरी , महिला , आणि लहानग्यांना एकत्र आणणारा सण आहे .

आधी बैलांना स्नान घालणे , नैसर्गिक रंगांनी सजवणे , त्यांना विश्रांती व चांगले जेवण देणे यावर भर होता . पण आता काही ठिकाणी डीजे , लाऊडस्पीकर , नाच–गाणी , रासायनिक रंग, प्लास्टिक सजावट यामुळे सणाचा मूळ हेतू हरवतो आहे . तसेच शेतीत ट्रॅक्टर , यंत्रसामग्री वाढल्यामुळे बैलांचे महत्त्व कमी झाले आहे . त्यासाठी आपण प्रयत्न व उपाययोजना करायला हव्या जसे की बैलपोळा सण पारंपरिक व पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करावा . बैलांच्या सजावटीसाठी नैसर्गिक रंग व साहित्य वापरावे .मुलांना व तरुण पिढीला सणाचे खरे महत्त्व समजावून सांगावे . गावात सांस्कृतिक कार्यक्रम , पोवाडे , शेतकऱ्यांच्या कथा सांगून परंपरा जपावी . बैलपोळा सणाचा ऱ्हास थांबवण्यासाठी परंपरा , पर्यावरण आणि संस्कृती यांचा सन्मान राखून सण साजरा करणे गरजेचे आहे आजच्या यांत्रिकीकरणाच्या युगात पोळ्याचे महत्त्व काहीसे बदलले असले तरीही या सणाचे संस्कृतीशील मूल्य टिकवले गेले आहे . शहरी भागातही शाळांमधून लाकडी बैल , चित्रकला स्पर्धा, ओवी गायन , प्रात्यक्षिके , आणि पर्यावरणपूरक बैल बनवण्याचे उपक्रम राबवले जातात . सोशल मिडियावरून माहिती दिली जाते . काही ठिकाणी 'इको–फ्रेंडली पोळा' साजरा केला जातो . या सणाद्वारे आपण निसर्ग , प्राणी , आणि शेती या तीनही घटकांना एकत्र बांधून ठेवणारा धागा जपतो . पोळा सण म्हणजे शेतकऱ्याचे आपल्या कामाच्या जोडीदाराबद्दलची कृतज्ञता , प्रेम , आणि आपुलकी व्यक्त करण्याचा दिवस. तो केवळ बैलांचा सण नाही, तर आपल्या संस्कृतीचा अभिमान आहे . म्हणूनच हा सण साजरा करताना प्रत्येकाने बैलांप्रती प्रेम , जपणूक आणि सन्मान जपावा . आजच्या पिढीनेही या सणाचे महत्त्व समजून घेतले पाहिजे, कारण ही आपली माती , आपली संस्कृती आणि आपली ओळख आहे. आपल्या बैलपोळा सणाची संस्कृती जतन करण्यासाठी काही गोष्टी करणे आवश्यक आहे :

१. पारंपरिक पद्धती जपणे : बैलांना रंग , फुले , गोंडे लावताना नैसर्गिक व सुरक्षित वस्तूंचा वापर करावा . बैलांना सजवताना त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी .

२. पिढ्यान् पिढ्या संस्कार देणे : लहान मुलांना बैलाचे महत्व , शेतकऱ्याचे श्रम व बैलपोळ्याची परंपरा याबद्दल सांगावे . शाळा , महाविद्यालयांमध्ये बैलपोळा विषयावर निबंध, नाटिका, चित्रकला स्पर्धा घेता येतात .

३. समाजातील सहभाग वाढवणे : गावागावांत बैलांची मिरवणूक , पारंपरिक खेळ व पोवाडे आयोजित करावेत . गावातील सर्वजण मिळून सण साजरा केल्यास एकतेची भावना वाढते .

४. आधुनिकतेसोबत जोडणे : मोबाईल , सोशल मीडियावरून बैलपोळ्याचे महत्त्व लोकांपर्यंत पोहोचवावे . गावाची परंपरा दाखवणारे व्हिडिओ , माहितीपट तयार करून जतन करावेत. बैलपोळा संस्कृती जतन करण्यासाठी परंपरा , शिक्षण , समाजसहभाग , आधुनिक माध्यमे आणि पर्यावरणपूरक दृष्टिकोन यांचा योग्य संगम करणे गरजेचे आहे .

**– चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके ,**
**तहसीलदार , बीड**

◆ पान ४ वरून पुढे...

## मराठा मोर्चासाठी...

मुख्य महाव्यवस्थापक व प्रादेशिक अधिकारी, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, कोंकण–भवन, मुंबई व व्यवस्थापकीय संचालक, राष्ट्रीय महामार्ग, मुंबई यांना पत्र दिले असून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेवूनही मागणी केली आहे. मुख्य महाव्यवस्थापक व प्रादेशिक अधिकारी, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, कोंकण–भवन, मुंबई व व्यवस्थापकीय संचालक, राष्ट्रीय महामार्ग, मुंबई यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे, दि.२९ ऑगस्ट २०२५ रोजी मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली होत असलेल्या मुंबई येथील आंदोलनात सहभागी होण्यासाठी बीडसह राज्यातील विविध जिल्ह्यांतून मोठ्या संख्येने नागरिक मुंबईकडे प्रवास करणार आहेत.या प्रवासासाठी हजारो वाहने मुंबईकडे येणार असून त्यामुळे मार्गावरील टोल नाक्यांवर मोठी गर्दी होणार आहे तसेच प्रवाशांवर अतिरिक्त आर्थिक भार येणार आहे. शेतकरी, युवक आणि सर्वसामान्य नागरिक स्वयंस्फूर्तपणे या आंदोलनात सहभागी होत असल्यामुळे त्यांच्यावर जादा खर्च पडू नये, यासाठी त्या कालावधीत मुंबईकडे येणाऱ्या व जाणाऱ्या सर्व वाहनांना टोलमाफी देण्यात यावी, या निर्णयामुळे जनतेला आर्थिक दिलासा मिळेल, टोल नाक्यांवरील गर्दी कमी होईल व वाहतूक व्यवस्थापन सुलभ होईल म्हणून या संदर्भात तातडीने आवश्यक आदेश निर्गमित करावेत, असे म्हटले आहे. मुख्य महाव्यवस्थापक व प्रादेशिक अधिकारी, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, कोंकण–भवन, मुंबई व व्यवस्थापकीय संचालक, राष्ट्रीय महामार्ग, मुंबई यांना पत्र दिल्यानंतर खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची देखील भेट घेतली.

## मनोरंजनाच्या....

पोलिस अधिकारी आणि कर्मचारी यांच्या संगनमताने अवैध धंदे सुरू झाले आहेत.यामध्ये सर्रास उघड पने सुरू असलेले अवैध पत्त्यांचे क्लब आता नव्याने शासनाच्या नियमानुसार सुरू असल्याचे दाखवत रोज लाखो रुपयाची उलाढाल करत असताना याकडे,जिल्हाधिकारी साहेब ,पोलिस अधीक्षक साहेब , धर्मदाय आयुक्त बीड ,उपविभागीय पोलीस अधिकारी,स्थानिक पोलीस प्रशासन डोळेझाक का करत आहे असा सवाल? आता उपस्थित केला जात असून.याबाबत विविध वृत्तपत्रात बातम्या येऊन ही यंत्रणा गार असणे ही शंका येणारी बाबआहे.यावरून स्थानिक अधिकारी यांचे आर्थिक बाबतीत मिंदे आहेत का? असेही लोकांतून बोलले जात आहे. गेवराई तालुक्यातील तलवाडा आणि तलवाडा परिसरातील पोलिस ठाणे हद्दीत अवैध धंदे जोमात सुरू आहेत याकडे अधिकारी आणि पोलिस कर्मचारी यांचे आर्थिक तडजोडीतून दुर्लक्ष होत असल्याने यावर कोणाचा वाचक राहिला नसल्याचे दिसून येत असून ,तलवाडा सारख्या मोठ्या सर्कल च्या गावात शासनाच्या नियमानुसार चालणाऱ्या क्लब च्या नावाखाली सभासदा कडून रोख रक्कम घेऊन त्या बदल्यात त्यांना कॉइन देऊन रमी नावाचा जुगार चालवण्यात येत असून ज्यांच्याकडे रोख रक्कम नाही त्यांच्या कडून ऑनलाइन पैसे जमा करून त्यांना कॉइन देऊन पत्ते खेळवले जातात,यामध्ये अनेक तरुणांचे संसार उध्वस्त होत असून हा खेळ खेळणारे लोक कर्जबाजारी होत आहेत.याकडे कोणीच लक्ष देत नसल्याने आमचे कोणीच काही करु शकत नाही अशी भावना या क्लब चालकाची झाल्याने यांच्यापुढे पोलिस यंत्रणा हतबल झाली की काय ? असा प्रश्न निर्माण होत आहे. हे बुद्धी कौशल्याचे क्लब चालवण्याचा अधिकार यांना कोणी दिला, याची तपासणी कोण करणार,यावर कोणाचे नियंत्रण असावे याचे स्पष्ट स्पष्टीकरण असणे गरजेचे आहे ते कुठेही आढळून येत नाही,या शाखा चालविणाऱ्यांना

◆ पान ४ वरून पुढे...

शाखा चालविता येते का ? हे स्थानिक पोलिस यंत्रणेला माहीत आहे का ? जर माहीत नसेल तर आणि यांना कारवाई करण्याचा अधिकार नसेल तर यांना घटना आणि शाखा चालवत असल्याचे घटना आणि प्रमाणपत्र का द्यायचे ? त्याच बरोबर हप्ते का द्यायचे असा प्रश्न पत्रकार,सामाजिक कार्यकर्ते,सामान्य नागरिक यांना पडतो आहे.आणि जर कायदा आणि सुव्यवस्था अबाधित ठेवायची असेल ,गुहेगारी वृत्ती कमी करायची असेल तर हे धंदे बंद करण्याशिवाय पर्याय नाही हे पोलिस यंत्रणेने जाणून घ्यायला हवे.

## प्रत्यक्ष पाणी...

प्रकल्पातून दोन्ही पंपाद्वारे सुमारे १६० क्यूसेक पाणी सोडले गेले असता प्रत्यक्ष पाणी मेहकरी मध्यम प्रकल्पात पोहोचताच परिसरातील ग्रामस्थ व शेतकरी बांधवांनी जलपूजन करून आनंद व्यक्त करत आ.सुरेश धस यांचे आभार मानले. यंदा सीना मध्यम प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात समाधानकारक पाऊस झाल्याने प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरला असुन परिणामी अतिरिक्त पाणी नदीद्वारे वाहून जात होते.या पार्श्वभूमीवर आष्टी मतदारसंघाला या पाण्याचा लाभ मिळावा, यासाठी आमदार धस यांनी सातत्याने पाठपुरावा करून त्यास प्रतिसाद देत प्रशासनाने तातडीने आवश्यक तांत्रिक प्रक्रिया व दुरुस्ती पूर्ण करून याशिवाय थकीत असलेले ३६ लाख ८४ हजार रुपयांचे वीजबिलही भरले गेले. मेहकरी धरणात पाणी सोडण्याचा मार्ग मोकळा झाल्याने गुरुवारी दि.२१ ऑगस्ट रोजी प्रत्यक्ष पाणी मेहकरी मध्यम प्रकल्पात पोहोचताच परिसरातील ग्रामस्थ व शेतकरी बांधवांनी जलपूजन करून आनंद व्यक्त केला. या संपूर्ण प्रक्रियेत पुणे व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ गुनाळे,कार्यकारी अभियंता धाराशिव मध्यम प्रकल्प विभाग,धाराशिव, कार्यकारी अभियंता उजनी जलविद्युत विभाग, इंदापूर, कार्यकारी अभियंता जलसंपदा विभाग, बीड, कार्यकारी अभियंता सीना मध्यम प्रकल्प, उपकार्यकारी अभियंता पालवनकर, उपअभियंता आडे तसेच विद्युत व यांत्रिकीकरण विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी महत्त्वाचे सहकार्य केले. आ.सुरेश धस यांचे परिसरातील ग्रामस्थांकडून आभार मानत समाधान व्यक्त केले.

## केज मतदार...

५ एमव्हीए वरून १० एमव्हीए पर्यंत वाढवण्यास देखील मान्यता मिळाली आहे. या निर्णयामुळे सदरील सबस्टेशनवर अवलंबून असणारी वीज यंत्रणा सक्षम होणार असून शेतकऱ्यांना दिवसा सिंचनासाठी आवश्यक वीजपुरवठा अधिक स्थिर आणि निश्चित स्वरूपात उपलब्ध होईल. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेअंतर्गत राज्यभरात सबस्टेशनची क्षमता वाढविण्याचे काम सुरू आहे. त्यात केज मतदार संघातील विविध भागातील सबस्टेशनना प्राधान्याने मंजुरी मिळाली आहे. आ. नमिता मुंदडा यांनी या कामासाठी वारंवार पाठपुरावा करून संबंधित विभागांशी सातत्याने संपर्क साधला. त्यांच्या या पाठपुराव्याचे फलित म्हणून बीड जिल्ह्याला एकाचवेळी अतिरिक्त पॉवर ट्रान्सफॉर्मर आणि सबस्टेशन क्षमता वाढविण्यासाठी मंजुरी मिळाली आहे. या निर्णयामुळे दिवसा वीजपुरवठा होणार असल्याने शेतकऱ्यांना रात्री जागरण करण्याची गरज भासणार नाही. सिंचनासाठी नियोजनबद्ध पद्धतीने वीज उपलब्ध होणार आहे. विजेवरील अनियमित भार कमी होऊन यंत्रणा सुरळीत आणि कार्यक्षम राहील. या मंजुरीबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, ना. पंकजाताई मुंडे यांचे आ. नमिता मुंदडा यांनी आभार मानले आहेत.

◆ पान ४ वरून पुढे...

## पतसंस्थांच्या घोटाळ्यात...

या प्रकरणी आमदार प्रकाशदादा सोळंके यांच्या अथक प्रयत्नांना अखेर यश आले आहे. आज लोकसभेत केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी या पतसंस्थांविषयी महत्त्वाची घोषणा केली आहे. केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी लोकसभेत घोषणा करताना सांगितले की या सर्व पतसंस्थांना विघटित केले जाणार आहे. लिक्विडेटरमार्फत या संस्थांची संपत्ती विकली जाईल आणि मिळालेल्या रकमेतून ठेवीदारांना त्यांचे पैसे परत दिले जाणार आहेत. संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक आणि न्यायसंगत पद्धतीने राबवली जाणार असल्याची खात्री त्यांनी दिली. या यशामागे आमदार प्रकाशदादा सोळंके यांचे अथक प्रयत्न आहेत. त्यांनी राज्यस्तरावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी सतत चर्चा केली आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत सक्रिय सहभाग घेतला. राज्य सरकारकडे निरंतर दबाव आणून केंद्रीय पातळीवर चौकशीची मागणी केली. संबंधित केंद्रीय मंत्र्यांशी भेटीगाठी करून संसदीय प्रश्न आणि ठराव मांडले.या पाच बहुराज्यीय पतसंस्थांमध्ये झालेल्या घोटाळ्यामुळे हजारो गरीब व मध्यमवर्गीय कुटुंबांचे पैसे अडकले आहेत. शेतकरी, कामगार, नोकरदार आणि व्यापारी यांना मोठा फटका बसला आहे. अनेकांनी आपल्या आयुष्यभरात जमवून ठेवलेले बचतीचे पैसे गमावले आणि मानसिक त्रासाला सामोरे जावे लागले.या घोषणेनंतर ठेवीदारांमध्ये आनंदाची लाट पसरली आहे. अनेक ठेवीदारांनी आमदार प्रकाश सोळंके यांचे आभार मानले आहेत. एका ठेवीदाराने म्हटले, आम्ही जवळजवळ आशा सोडली होती. प्रकाश दादांच्या प्रयत्नांमुळे आज आमच्या न्यायाची आशा पुन्हा जागृत झाली आहे.या घोषणेनंतर लवकरच लिक्विडेटर नियुक्त केले जाणार आहेत. संस्थांची मालमत्तेची विस्तृत यादी तयार करून ठेवीदारांच्या दाव्यांची पडताळणी सुरू होणार आहे. चरणबद्ध पद्धतीने परतफेडीची प्रक्रिया राबवली जाणार असून या कामाला प्राथमिकता दिली जाणार आहे. या घोषणेमुळे हजारो ठेवीदारांना न्याय मिळण्याची आशा निर्माण झाली आहे. आमदार प्रकाश सोळंके यांच्या चिकाटी आणि दृढनिश्चयामुळे जनतेच्या पैशाचा हक्क परत मिळवण्यात यश आले आहे. ही घोषणा केवळ ठेवीदारांसाठी दिलासादायक नाही तर न्यायव्यवस्थेवरील जनतेच्या विश्वासाला बळकटी देणारी आहे. प्रकाश सोळंके यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेली ही लढाई आता निर्णायक टप्प्यावर पोहोचली आहे आणि ठेवीदारांना त्यांचा हक्क मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

## आम आदमी...

हे आंदोलन करण्यात आले. 'आप'च्या शिष्टमंडळाने बीड जिल्ह्यातील काही शाळांची पाहणी केली असता, त्यांना अनेक गंभीर समस्या आढळल्या. यामध्ये शाळांच्या इमारतींची खराब झालेली स्थिती, काही ठिकाणी शौचालये आणि पिण्याच्या पाण्याची सोय नसणे, तर काही शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता अशा बाबी समोर आल्या आहेत. काही शाळा तर भाड्याच्या इमारतींमध्ये किंवा झाडांखाली भरत आहेत. 'आप'ने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सरकार या गंभीर समस्येकडे दुर्लक्ष करत आहे, जणू काही ते झोपलेच आहेत. याच कारणामुळे, सरकारला जागे करण्यासाठी आणि या शाळा वाचवण्यासाठी उपाययोजना करण्याची आठवण करून देण्यासाठी २१ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ११ ते दुपारी २ वाजेपर्यंत 'झोप काढू' आंदोलन करण्यात येणार आहे. हे निवेदन मुख्यमंत्री, पालकमंत्री, आणि शिक्षणमंत्री यांना बीडच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांमार्फत निवेदन मुख्यमंत्री शिक्षा मंत्री जिल्हाधिकारी महोदय मराठवाडा आयुक्त देण्यात आले आहे. या आंदोलनात जास्तीत

◆ पान ४ वरून पुढे...

जास्त नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन 'आप'ने केले आहे. यावेळी 'आप'चे जिल्हाध्यक्षअशोक येडे, सहदेव खंडागळे, कैलासचंद पालीवाल, माऊली शिंदे, भीमराव कुठे जिल्हाध्यक्ष बामसेफ नितीन सोनवणे जिल्हाध्यक्ष ऑल इंडिया पँथर नितीन जायभाय बीड शहर बचाव मंच डीजे तांदळे सर शिक्षक संघटना अशोक जोगदंड संतोष जोगदंड यांना सय्यद सादेक, शहराध्यक्ष मिलिंद पाळणे, रफिक पठाण, कृष्णा जगताप तालुकाध्यक्ष बीड, व्यंकट मुंडे परळी राजेश देशमुख परळी शहराध्यक्ष नासिर मुंडे साहेब केज तालुका अध्यक्ष सुहास चौधरी आष्टी तालुकाध्यक्ष रफिक पठाण अल्पसंख्याक विभाग प्रमुख डॉक्टर दीपक कोल्हारआणि आजम खान यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

## ज्येष्ठ पत्रकार...

मराठी पत्रकार परिषदेचे माजी विभागीय सचिव दिलीप खिस्ती, विभागीय सचिव रवी उबाळे, विभागीय समन्वयक सुभाष चौरे ,राज्य कार्यकारणी सदस्य विलास डोळसे जिल्हा अध्यक्ष विशाल साळुंके, जिल्हा कार्याध्यक्ष गजानन मुडेगावकर, जिल्हा सरचिटणीस सुभाष सुतार, जिल्हा कोषाध्यक्ष धनंजय आरबुणे ,जिल्हा प्रसिद्धीप्रमुख संजय हंगे, हल्ला विरोधी कृती समितीचे जिल्हा निमंत्रक दत्ता आंबेकर ,जिल्हा समन्वयक अभिमान्यु घरत, जिल्हा उपाध्यक्ष चंद्रकांत राजहंस, सचिन पवार,अविनाश कदम, जुनेद बागवान, दिलीप झगडे, संजय रानभरे, गौतम बचुटे ,कादर मकरानी , तालुका अध्यक्ष दत्ता आजबे, मधुकर तौर, जालिंदर नन्नवरे ,अजय जोशी, हरीश यादव, विजय आरकडे, सतीश सोनवणे, प्रशांत लाटकर आदींनी केले आहे.

## राज्याच्या केंद्रस्थानी...

धनंजय मुंडे व अंजली दमानिया सामने –आमने आले आहेत.

कृषी सचिव व्ही. राधा यांनी मंत्र्यांना कृषी विभागातल्या भ्रष्टाचाराची फाइल पाठवली होती. हीच फाइल धनंजय मुंडे यांनी गायब केल्याचा दावा अंजली दमानिया यांनी केलाय. दमानिया यांच्या आरोपावर धनंजय मुंडे यांची प्रतिक्रिया अद्याप तरी आलेली नाही.

धनंजय मुंडे यांनी कृषी विभागातल्या भ्रष्टाचाराची आणि गौडबंगालाची फाइल गायब केली आहे, असा आरोप सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केला. त्यामुळे पुन्हा एकदा महाराष्ट्रातल्या कृषी विभागावरचे आरोप चर्चेत आलेत. अंजली दमानिया यांना महाराष्ट्र सरकारकडून कक्ष अधिकारी रुचिता पिंपळे यांनी पत्र पाठवले आहे. त्यात पत्रात म्हटले आहे की, 'महोदय, कापूस सोयाबीन व इतर तेलबिया पिकांची उत्पादकता वाढव व मूल्य साखळी विकासासाठी विशेष कृती योजनेअंतर्गत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने कृषी आयुक्तालयाने सादर केलेल्या अहवालाच्या आधारे तत्कालीन प्र. स. (कृषी) यांनी तत्कालून मा. मंत्री (कृषी) यांच्याकडे जी नस्ती/अहवाल सादर केलेला आहे त्याबाबतची नस्ती/अहवालाची आपण दूरध्वीद्वारे उपसचिव (कृषी) यांच्याकडे मागणी केलेली आहे.

कृषी वस्तूंची खरेदी तिप्पट दराने केली असल्याचा आरोप

शेतकऱ्यांसाठीच्या योजनेतील नियम धाब्यावर बसवून धनंजय मुंडे यांनी कृषिमंत्री असतांना २४५ कोटींचा घोटाळा केल्याचा आरोप अंजली दमानिया यांनी केला होता. खुल्या बाजारातील वस्तूंचे दर आणि कृषी खात्याने खरेदी केलेल्या दरात मोठी तफावत असल्याचा आरोपच दमानिया यांनी कागदपत्रासंह केला होता. १२ मार्च आणि १५ मार्च २०२४ असे जीआर कृषी खात्याने काढले. त्याअंतर्गत कापूस गोळा करण्याच्या बॅग, नॅनो युरिया, नॅनो डीओबी, फवारणी पंप अशा वस्तूंची खरेदी केली आहे. या वस्तूंची खरेदी बाजारभावाच्या तुलनेत तिप्पट दराने खरेदी केल

◆ पान ४ वरून पुढे...

## नाकाबंदी करून...

किलो १४० ग्रॅम गांजा सापडला. या प्रकरणी नेकनूर पोलीस ठाण्यात गु.र.नं. २२८/२०२५ कलम २०(ब), ८(क) अंमली पदार्थ नियंत्रण कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास स्थानिक गुन्हे शाखा बीड आणि नेकनूर पोलीस करीत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, सपोनि चंद्रकांत गोसावी, पोउपनि महेश विघ्ने, पोहवा महेश जोगदंड, जफर पठाण, भागवत शेलार, दिपक खांडेकर, बप्पासाहेब घोडके तसेच इतर पथकातील पोलिसांनी केली.

## बीड जिल्ह्यात...

बीड हे उपस्थित होते. याप्रसंगी श्री. सचिन घोडके, उपनिबंधक, बीड; प्राचार्य निकाळजे सर; आणि जिल्ह्यातील सर्व तालुक्यांचे सहायक निबंधक व अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते. बीड जिल्ह्यातील २५० ते ३०० प्रशिक्षणार्थींनी या प्रशिक्षणात मोठ्या संख्येने सहभाग घेतला. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून झाली. त्यानंतर मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रमुख मार्गदर्शक श्री. धनंजय डोईफोडे यांनी केले, तर अध्यक्षीय भाषणात श्री. सतीश तोटावार यांनी पतसंस्थांना मार्गदर्शन केले.पहिल्या सत्रात श्री. संदीप आराख (एपीआय) आणि श्री. पंचम वडमारे (सायबर विभाग, बीड) यांनी सायबर सुरक्षा या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी सायबर फसवणूक, डिजिटल अटक, घोटाळे, क्रिप्टोकरन्सी आणि अँटी मनी लॉन्ड्रिंग यांसारख्या महत्त्वाच्या बाबींवर सविस्तर माहिती देत पतसंस्थांनी कोणती काळजी घ्यावी, याबाबत मार्गदर्शन केले. दुसरे व्याख्यान प्रियदर्शिनी नागरी सहकारी बँक, जालना येथील मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. सचिन वाणी

◆ पान ४ वरून पुढे...

यांनी ठेव संकलन व निधी व्यवस्थापन या विषयावर दिले.दुपारच्या सत्रात श्री. सचिदानंद नाईकवाडी (उपनिबंधक, सहकारी संस्था, सेवानिवृत्त, पुणे) यांनी थकीत कर्ज वसुली प्रक्रियेसाठी घ्यावयाच्या दक्षता व कायदेशीर तरतुदींबद्दल मार्गदर्शन केले. शेवटच्या व्याख्यानात ॲडव्होकेट श्री. महेंद्र खरात, पुणे यांनी आर्थिक साक्षरता व नियामक मंडळाच्या तरतुदी या विषयावर सखोल माहिती दिली. सर्व वक्त्यांनी उपस्थितांना उत्कृष्ट मार्गदर्शन केले. प्रशिक्षणार्थींनीही या कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. सिद्धेश्वर सांगुळे यांनी केले, तर प्रशिक्षण समन्वयक म्हणून श्री. मयूर शेळके यांनी जबाबदारी पार पाडली. सर्व प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले आणि श्री. पवन पाटील यांच्या आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## अतिवृष्टी मुळे...

भुरेवाडी,मुगगाव, चिखली, चिंचोली,अंतापूर,निवडुंगा आदी गावांमध्ये पावसाने कहर केला आहे. शेतकऱ्यांच्या शेतांचे अक्षरशः तलाव झाले असून, पिके सडून जात आहेत. यामुळे शेतकऱ्यांच्या हिताचे नेते भाऊसाहेब भवर यांनी सांगितले की, अमळनेर सर्कल परिसरातील शेतकरी फक्त शेतीवरच अवलंबून आहेत. त्यामुळे उभ्या पिकांचे झालेले प्रचंड नुकसान हा शेतकऱ्यांच्या उदरनिर्वाहाचा मोठा प्रश्न निर्माण करणारा आहे. एकमेव उत्पन्नाचा मार्ग बंद झाल्याने शेतकरी मानसिक तणावाखाली येण्याची शक्यता आहे. यामुळे शेतकऱ्यांना आत्महत्येच्या मार्गावर जाण्यापासून वाचवण्यासाठी तातडीने पंचनामे करून भरीव आर्थिक मदत करणे अत्यावश्यक असल्याचे आवाहन भाऊसाहेब भवर यांनी प्रशासनाला केले आहे.

## तात्काळ पंचनामे....

◆ पान ४ वरून पुढे...

सणासुदीच्या तोंडावर सावकाराच्या दारात गेल्याशिवाय पर्याय राहायला नाही तरी सरकारने ज्याप्रमाणे लाडकी बहीण योजनेसाठी कोणतीही निकष न ठेवता तात्काळ तात्काळ वर्ग केले त्याच धरतीवर तात्काळ शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी अशी मागणी गेवराई तालुका काँग्रेसचे तालुकाध्यक्ष महेश बेदरे यांनी शासनाने कडे केली आहे छळ्ठऋ च्या निकषा प्रमाणे झालेली अतिवृष्टी खूप झाली आहे पीक विमा कंपन्या या अतिवृष्टी तील नुकसानी चे अनेक निकष लावून शेतकरायला मदत देण्या ऐवजी स्वतःचा व्यवसाय पुढे ठेवून पिक विमा टाळतात शासनांने शेतकऱ्यावर आलेल्या या आसमानी संकटाला सावरण्यासाठी तात्काळ मदत द्यावी राज्याचे अर्थमंत्री अजित दादा पवार हे जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत त्यांनी शेतकऱ्याच्या या झालेल्या नुकसानीची दखल घेऊन सढळ हाताने शेतकऱ्यांना सरसकट मदत द्यावी अशी बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या अपेक्षा आहे नसता बीडला पालकमंत्री असून याचा उपयोग काय असा शेतकऱ्यांना प्रश्न पडू नये एकीकडे शेतकऱ्याला आसमान संकटाने मारले आहे सरकारने तरी शेतकऱ्यांना मदत द्यावी अशी शेतकऱ्यांची अपेक्षा आहे.

## मनोज दादा जरांगे....

जरांगे पाटील २९ ऑगस्ट रोजी मुंबईत धडकणार आहेत. या आरक्षण लढ्यात धामणगाव गटातील हजारो च्या संख्खेने सकल मराठा समाज बांधवांनी सहभागी व्हावे असे आवाहन विजय (आण्णा) गाढवे यांनी केले आहे

## हुतात्मा स्मारकाचे...

गुत्तेदारावरच मेहरबानी दाखवल्याचा आरोप होत असून तात्काळ कारवाई झाली नाही तर सामाजिक कार्यकर्त्यांनी तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा

◆ पान ४ वरून पुढे...

दिला आहे.स्मारकाचे काम तातडीने पूर्ण व्हावे, अन्यथा रस्त्यावर उतरून लढा उभारू, असा इशारा दिला आहे.

## पिंपळनेरच्या शेतकऱ्यांना...

बरसलेल्या पावसाने बळीराजामध्ये खुशीचे वातावरण दिसून आले आहे. बैलपोळा सण हा बळीराजाचा आनंदाचा व जिव्हाळ्याचा असल्याने वर्षभर चाकरी करणाऱ्या त्या सर्जा–राजासाठी साज खरेदीला शेतकऱ्यांनी गर्दी केली होती. यातून वर्षानूवर्ष बैल सजावटीच्या साहीत्यात वाढ होताना दिसून येत आहे. तरीही या सणाला पोटाला चिमटा घेवून आपल्या सर्जा–राजासाठी शृगांराचे साहीत्य, यात चौरंग, मठाठी, वेसन, दोर, माळ, मोरकी आदी साहित्य खरेदीसाठी शेतकऱ्यांची लगबग दिसून आली.

## लिंबागणेश येथे....

सुखदेव वाणी, विकास बारगजे, पत्रकार हरिओम क्षीरसागर यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. पो.नि. चंद्रकांत गोसावी म्हणाले की, गणेशोत्सव हा श्रद्धा व सामाजिक एकोप्याचा सण आहे. प्रशासन व गणेश मंडळांनी परस्पर समन्वयाने उत्सव सुरळीत पार पाडावा. यावर्षी राज्य पातळीवर गणेशोत्सव महोत्सव म्हणून साजरा होणार असल्याने ग्रामस्थांनी पर्यावरणपूरक मूर्ती, निर्माल्य विसर्जन व स्वच्छतेकडे विशेष लक्ष द्यावे. ध्वनी प्रदूषण, विजेची सुरक्षितता व वाहतूक व्यवस्थेचे काटेकोर पालन करावे. गणेश मंडळांनी ऑनलाईन परवाना घेऊनच गणपती स्थापना करावी. ध्वनीक्षेपक व लाईटिंग ठरवून दिलेल्या नियमांप्रमाणेच वापरावे, जेणेकरून लहान मुले, वयोवृद्ध व आजारी व्यक्तींना त्रास होणार नाही.गणेशोत्सव व ईद ए मिलाद हे दोन्ही सण एकात्मतेचे द्योतक असून जबाबदार नागरिक म्हणून सर्वांनी शांतता व सौहार्द टिकवावे, असे आवाहन त्यांनी केले.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural ) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

## थोडक्यात...

### प्रमिलादेवी पाटील महाविद्यालयामध्ये मानसिक आरोग्य कार्यशाळा संपन्न



**नेकनूर । प्रतिनिधी**

प्रमिलादेवी पाटील महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे मानसिक आरोग्य कार्यशाळा संपन्न झाली या कार्यशाळेसाठी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर ढास डी.के. हे उपस्थित होते. तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून जिल्हा आरोग्य केंद्राचे अतुल बडवे, गोरे मॅडम आणि जिल्हा विधीज्ञ सेवा विभागाचे मिथुन जोगदंड हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे अतुल बडवे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मानसिक आरोग्य संदर्भात माहिती सांगितली ते बोलत असताना म्हणाले की माणसाचे मानसिक संतुलन राखण्यासाठी माणसाने कोणत्याही कामाचा दबाव हा आपल्या झोपेवर व आरोग्यावर हानिकारक होईल असे घेऊ नये व मानसिक आरोग्य बिघडल्यावर जिल्हा आरोग्य केंद्राची संपर्क साधावा व त्यावरती उपचार करून घ्यावे असे सांगितले. तसेच मिथुन जोगदंड यांनी मोफत कायदेविषयक या विषयावर विद्यार्थ्यांना कायदे विषयी माहिती सांगितली व एड्स जनजागृती चे गोरे मॅडम यांनी विद्यार्थ्यांना एड्स विषयी माहिती सांगून पत्रक वाटण्यात आले व विद्यार्थ्यांना एड्स या रोगाविषयी जागृत राहणे आवश्यक आहे. असे मार्गदर्शन करताना सांगितले.

### 'एक पेड माँ के नाम' प्रमाणपत्राचे गटशिक्षणाधिकारी समंदर खान यांच्या हस्ते वाटप



**बीड । प्रतिनिधी**

शहरातील भालदार पुरा येथे असलेल्या मिल्लिया मुलींची उर्दू प्राथमिक शाळेत 'एक पेड माँ के नाम' हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. यावेळी गटशिक्षणाधिकारी समंदर खान, केंद्र प्रमुख मनियार हकीम यांच्या हस्ते सहभागी विद्यार्थ्यांना त्यांच्या आईंसोबत प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. शासनाच्या 'एक पेड माँ के नाम अंतर्गत विद्यार्थ्यांनी त्यांच्या आईंसोबत मिळून आपल्या परिसरात, शाळेत झाडे लावली. त्याचे फोटो लिंक मध्ये अपलोड करत वृक्षारोपण मध्ये सक्रिय सहभाग घेतला. नंतर याची ऑनलाईन प्रमाणपत्र प्राप्त झाली. त्या प्रमाणपत्राच्या वाटपाचा कार्यक्रम शाळेत घेण्यात आला. यावेळी शाळेतही वृक्षारोपण करण्यात आले. हा उपक्रम राबविल्याबद्दल गटशिक्षणाधिकारी समंदर खान पठाण आणि केंद्रप्रमुख हकीम मणियार यांनी शाळेचे कौतुक केले. शासनाचा 'एक पेड माँ के नाम' हा उपक्रम संस्थेच्या सचिव खान सबिहा बेगम यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्याध्यापिका मिर्झा कनिज़ फातेमा आणि पर्यवेक्षिका रिज़वाना बेगम कादरी यांच्या प्रमुख उपस्थितीत घेण्यात आला.


### अनुसूचित जमातीच्या दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय चर्चासत्रास हजारोंच्या संख्येने उपस्थित राहा-संभाजी गायकवाड

**बीड । प्रतिनिधी**



आदिवासी क्रांतीसुर्य बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंती वर्षानिमित्त बीड येथे दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे. या चर्चासत्रासाठी जिल्ह्यातील अनुसूचित जमातीतील पारधी, भिल्ल, कोळी महादेव, ठाकर, ठाकूर, राजगौड आदी जमातीतील बांधवांनी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन कोळी महादेव समाज संघटनेचे जिल्हाध्यक्ष संभाजी गायकवाड यांनी केले आहे सदरील आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात आदिवासी समाजाचे योगदान व भूमिका या विषयावर दिनांक २४ व २५ ऑगस्ट २०२५ रोजी चर्चासत्र होणार आहे या चर्चासत्रात भारतासह विदेशातील इतिहासकार, संशोधक, शिक्षणतज्ज्ञ, विचारवंत यांचे मार्गदर्शन होणार आहे. पुढे दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून आदिवासी विकासमंत्री डॉ.अशोक उईके, व अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, आदिवासी राज्यमंत्री इंद्रनील नाईक, माजीमंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर यांची उपस्थिती राहणार आहे. तसेच चर्चासत्रात आदिवासी नायकांच्या नेतृत्वातील स्वातंत्र्य लढ्यावर विशेष भर दिला जाणार आहे. तसेच आदिवासी सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत आदिवासी कला, संगीत व परंपरेचे सादरीकरण होणार आहे. उपरोक्त कार्यक्रम हा आदिवासी समाजासाठी एक पर्वणीच म्हणल्या जाणार आहे.

### वसंतदादा पाटील महाविद्यालयाचा वार्षिकांक 'ध्यास' चे प्रकाशन संपन्न




**पाटोदा । प्रतिनिधी**

वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचा वार्षिक अंक 'ध्यास' चे प्रकाशन नवगण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या सामाजिक जाणीवा समृद्ध करण्यासाठी महाविद्यालयाचा वार्षिकांक महत्वपूर्ण असल्याचे प्रतिपादन डॉ.योगेश क्षीरसागर यांनी या प्रसंगी केले. पाटोदा येथील वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासोबतच कला, सांस्कृतिक, साहित्यिक व सामाजिक जाणीव विकसित होण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातात. महाविद्यालयाचा वार्षिकांक 'ध्यास' या नावाने प्रत्येक शैक्षणिक वर्षामध्ये संपादित करून प्रकाशित केला जातो. १९ ऑगस्ट रोजी संपन्न झालेल्या विद्यार्थी, पालक व शिक्षक मेळाव्यात या अंकाचे प्रकाशन नवगण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी ह.भ.प रामकृष्ण रंधवे बापू, ह.भ.प राधाताई सानप, ह.भ.प पांडुरंग महाराज कराड, प्राचार्य डॉ.बळीराम राख, नगराध्यक्ष सौ. दिपाली जाधव, आमेर सिद्दिकी, सोपानराव राख, राजेंद्र जाधव, श्रीहरी राख, डॉ. अभय क्षीरसागर, प्रा.नामदेव चांगण,डॉ.गणेश पाचकोरे,प्रा.अनिल जोगदंड, अशोक पवार यांच्या सह ध्यास अंकाचे संपादक डॉ.न.पु.काळे, डॉ. ज्ञानेश्वर चौधरी, प्रा.विनोद गायकवाड, प्रा.कावेरी खुरणे यांची उपस्थिती होती .

# जयसिंग वीर च्या नेतृत्वाखाली करचुंडीतील गायरान प्रकरणी जिल्हा कचेरी समोर बेमुदत धरणे आंदोलन सुरु

**बीड । प्रतिनिधी**



मौजे करचुंडी गावालगत असणारी गायरान जमिन मिळावी यासाठी धरणे आंदोलन करणेत आले होते.तरी त्या आंदोलन काळादरम्यान आंदोलन कर्त्याच्या मागण्या मान्य न झालेमुळे दिनांक १४/०८/२०२५ ते मागण्या मान्य होईपर्यंत तसेच तीव्र आंदोलन चालू केले आहे.आंदोलन दरम्यान असणाऱ्या मागण्या पुढील प्रमाणे आहेत त्यामध्ये करचुंडी गावा व मंजेरी गाव बीड जिल्ह्यातील अनेक गावांदरम्यान लगत असणाऱ्या गायरान जमिनीचे पीडीत वंचित भूमिहिन शेतकऱ्यांना वाटप करणे पायी मोर्चा अनेक गावांदरम्यान लगत असणाऱ्या गायरान जमिनीचे वंचित भूमिहिन शेतकऱ्यांना वाटप करणे.सातबारा मध्ये शेतकऱ्यांचे नाव नोंद करणे अथवा चढवणे. पीक पंचनामे करणे तसेच पीक विमा शेतकरी पेंन्शन योजना मोफत बी बियाणे, अवजारे, शेततळे, मोफत वीज (सोलार पंप) आदी सवलती सुविधा लाभ देणे. सदर गायरान जमिनीचे पुर्ण अधिकार देणे आदि मागण्या संदर्भात मागण्या मान्य होईपर्यंत बीड जिल्ह्यातील बहुजन शेतकरी बांधव या आंदोलनात सहभागी होणार आहे व सदरचे आंदोनास मोठ्या संख्येने शेतकरी सहभागी होणार आहेत. गावाचे नाव करचुंडी मंजेरी गाव बेलखंडी व इतर गेवराई तालुक्यातील व माजलगाव तालुक्यातील सर्व बीड जिल्हा तालुक्यातील खेड्यापाड्यातील दलीत बांधव व विविध संघटना व विविध पक्षाचे पदाधिकारी यांनी पाठिंबा दर्शविला आहे.

मौजे करचुंडी गावातील एकुण गायरान धारकापैकी अर्ध्या गायरान धारकांचा ७/१२ मिळाले आहेत उर्वरित गायरान धारकांना ७/१२ देणेत यावेत. सन २०११ चा सुप्रीम कोर्ट आदेश मधात न आणता आमचा गायरान धारकांचा सन १९६५ चे आज रोजी ताब्या सुरू असलेला लढा विचाराधीन आज व त्वरीत सर्व शासकीय सुख सुविधा चा गायरान धारकांना लाभ देवुन त्यांना ७/१२ उतारा देणेत यावा. भारतदेश १९४७ ला स्वतंत्र मिळाले तरी बहुजन दलित बांधवानी अनेक स्वतंत्र मिळाले नसुन त्यांचा १९६५ चा गायरान जमिनीचा लढा चालु असून सातबारा नावावर करून देण्यात यावे व करचुंडी, गावांमध्ये दलीत बांधवाचे स्मशान भुमीचा गंभीर प्रश्न असुन स्मशान भुमी उपलब्ध करून देण्यात यावी व दलित वस्तीचे रस्ते, कॉंक्रेट किंवा ब्लक करून देण्यात यावे व दलित वस्ती पाणी गंभीर प्रश्न असुन पिण्याच्या पाण्याचे नळ योजना तात्काळ देण्यात यावे घरकुल योजना राहिलेलया लोकांना तात्काळ देण्यात यावे या सर्व मागण्यांसाठी खरसुंडी येथील गायरान व इतर बघण्यासाठी समस्त शेकडोच्या संख्येने भूमीन गायरान धारक बेमुदत धरणे आंदोलन करण्यासाठी जिल्हा कचेरी समोर बसले आहेत.

## रिपब्लिकन सेना आयोजीत साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती महोत्सव व शाखा उद्घाटन सोहळ्यास उपस्थित रहा : वशिष्ठ लांडगे

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील रिपब्लिकन सेना छत्र बोरगाव आयोजीत साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त शनिवार दिनांक २३ ऑगस्ट रोजी विवीध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून विवीध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडणार आहे. या सोहळ्यास उद्घाटक म्हणून रिपब्लिकन सेनेचे बीड जिल्हा अध्यक्ष विजय दादा साळवे यांची तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवसेना अल्पसंख्याक महाराष्ट्र राज्याचे प्रदेशाध्यक्ष सईद भैय्या खान यांच्या सह तुळजाभवानी अर्बनचे चेअरमन चंद्रकांत शेजुळ खरेदी विक्री संघ माजलगावचे सभापती दिपकराव जाधव संचालक लोकनेते सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन छगनराव जाधव अरुण काका जाधव खरेदी विक्री संघ संचालक ज्ञानेश्वर जाधव मराठा सेवा संघ प्रदेश संघटक पुरषोत्तम जाधव सर यांची उपस्थिती राहणार आहे.

कार्यक्रमाच्या रूपरेषे मध्ये सकाळी ठिक ०९ वाजता सरपंच अशोक सोळंके यांच्या हस्ते



पंचशिल ध्वजाचे ध्वजारोहण होईल सायंकाळी ०५ वाजता रिपब्लिकन सेना शाखेचे उद्घाटन विजय साळवे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. लागलीच साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन सभा घेऊन स्नेह भोजन व संध्याकाळी ठिक ०८ वाजता महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध ख्यातनाम गायक शाहीर सुरेश रंजवे यांचा गायनाचा कार्यक्रम सादर केला जाणार आहे. तरी तालुक्यासह पंचक्रोशीतील सर्व नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन स्वागताध्यक्ष तथा रिपब्लिकन सेनेचे तालुकाध्यक्ष वशिष्ठ लांडगे महिपती कदम विलास निसर्गंध एस.बी. कदम अनिल कसबे प्रशांत लांडगे एस.बी. लांडगे बी.एस. गायकवाड कैलास निसर्गंध आदींनी केले आहे.

## गणेशोत्सवात कोकणात जाणाऱ्या भाविकांना टोलमाफी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा निर्णय

**मुंबई । प्रतिनिधी**

यंदाच्या गणेशोत्सवात कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांसाठी मोठा दिलासा देणारा निर्णय उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला आहे. २३ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर २०२५ या कालावधीत मुंबई-बेंगळुरू राष्ट्रीय महामार्ग, मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग आणि महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या अखत्यारितील रस्त्यांवरील टोल नाक्यांवर गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या वाहनांना व एसटी बसेसना टोलमाफी मिळणार आहे. यासाठी गणेशोत्सव २०२५ - कोकण दर्शन या नावाचे विशेष टोलमाफी पास देण्यात येणार असून त्यावर वाहन क्रमांक व वाहन मालकाची माहिती नोंदवली जाईल. हे पास संबंधित प्रादेशिक परिवहन अधिकारी, पोलीस व वाहतूक विभागाकडे उपलब्ध असतील. परतीच्या प्रवासासाठी देखील हेच पास ग्राह्य धरले जाणार आहेत. ते शासनाच्या आदेशानुसार ग्रामीण व शहरी पोलीस तसेच प्रादेशिक परिवहन विभागाने पास वाटपाचे समन्वय साधून प्रवाशांना वेळेत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, तसेच या संदर्भात जाहीरात व सूचना प्रसिद्ध करून जनतेला माहिती देण्याचे निर्देश उपमुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.

## 22 वर्षांच्या सेवेनंतर सेवानिवृत्त सैनिक संतोष पाटोळे जन्मभूमीमध्ये सन्मानित

### डोंगरकिन्हीत ग्रामस्थांनी काढली सहकुटुंब मिरवणूक

**बीड । प्रतिनिधी**

भारतीय सैन्यात २२ वर्षे सेवा करून सेवानिवृत्त झालेल्या संतोष पाटोळे यांचा सहकुटुंब जन्मभूमीत जंगी मिरवणूक काढून गावकऱ्यांनी उत्साहात सन्मान केला. २००२ साली सैन्यात भरती झालेले पाटोळे यांनी जम्मू-काश्मीर, लडाख, आसाम, राजस्थान, अरुणाचल प्रदेश व पश्चिम बंगालसारख्या संवेदनशील सीमावर्ती भागात देशसेवा केली होती.

पाटोळे यांच्यासह त्यांच्या कुटुंबीयांना जीपमधून मिरवणुकीतून गावभर नेण्यात आले. त्यानंतर संत वामणभाऊ सभामंडपात मुख्य कार्यक्रम पार पडला. यावेळी हरिहरेश्वर महाराज



महेंद्र शास्त्री, सरपंच आण्णासाहेब येवले, ग्रामपंचायत सदस्य संभाजीराजे येवले, आर.आर. येवले, पाटोळे मेजर, शेखलाल शेख, चव्हाण, दराडे मेजर आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच परिसरातील आजी-माजी सैनिक, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित राहिले. यावेळी कैलास येवले, दिलीप म्हस्के, बाळासाहेब म्हस्के, भागवत खिल्लारे, संजय मळेकर, दरेकर फौजी, तानाजी सोनटक्के, हनुमंत येवले, अशोक येवले, प्रविण सोनवणे, परमेश्वर सातपुते, नितिन भारती, मुन्ना शेख, भाऊसाहेब तुपे, विठ्ठल पाटोळे, युवराज चव्हाण, सखाराम अतकरे, विक्रम म्हस्के, तबाजी इंगळे, संजय येवले, रशिद शेख, सुरेश वाल्हेकर, मधुकर येवले, अरुण येवले, प्रकाश मळेकर यांच्यासह इतर ग्रामस्थांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेतला. शिवशक्ती संघाचे अध्यक्ष व सदस्यांनी कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन करून सोहळ्याला विशेष शोभा आणली.

## अक्षय ऊर्जा ही मानवाला लाभलेली निसर्गाची देणगी आहे: शाम सुंदर घाडगे

**बीड । प्रतिनिधी**

येथील सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात माजी पंतप्रधान स्व.राजीव गांधी यांची जयंती राष्ट्रीय सदभावना दिन म्हणून साजरी करण्यात आली.तसेच अक्षय ऊर्जा दिन साजरा करण्यात आला.या निमित्त महाविद्यालयात सदभावना प्रतिज्ञा सामुहिक रित्या घेण्यात आली.या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर हे उपस्थित होते.

यावेळी अक्षय उर्जा दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयात अक्षय ऊर्जा दिन या विषयावर श्री.शामसुंदर घाडगे (महाराष्ट्र राज्य विज्ञान पुरस्कार विजेते) यांचे व्याख्यान संपन्न झाले. आपल्या व्याख्यानात श्री.शामसुंदर घाडगे



म्हणाले की, आज भारताला अक्षय ऊर्जेची अत्यंत गरज आहे. अक्षय ऊर्जा कधीही न संपणारी ऊर्जा आहे.ऊन, वारा या पासून प्रचंड प्रमाणात विद्युत निर्मिती केली जात आहे. भारतामध्ये अक्षय ऊर्जा निर्मितीवर शासनाचा देखील जोर आहे. कारण इतर ऊर्जा स्त्रोत हे कायम स्वरूपी नाहीत.ते एकना एक दिवस संपणार आहेत.म्हणून सूर्य प्रकाश वारा,पाणी,या पासून ऊर्जा निर्मिती करणे काळाची गरज आहे. विशेष करून विज्ञान शिकणार्या विद्यार्थ्यांनी यावर लक्षवर लक्ष केंद्रीत करणे आवश्यक आहे. असे त्यांनी यावेळी प्रतिपादन केले.

यावेळी कार्यक्रमाचा समारोप करताना कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर म्हणाले की, भारता सारख्या विकसनशील देशाला अक्षय ऊर्जेची गरज आहे. कारण ही ऊर्जा मोफत आणि मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे. जसे अन्न,वस्त्र,निवारा मुलभूत गरजा आहेत.तसेच शिक्षण ही देखील चौथी गरज महत्व पूर्ण आहे. कारण त्यातून नविन संशोधन केले जाते.

## पाऊस ओसरताच पंचनामे तात्काळ पूर्ण करा अतिवृष्टीबाधित मदतीपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्या : पालकमंत्री शंभूराज देसाई

**सातारा । प्रतिनिधी**

पावसाचे प्रमाण व धरणातून विसर्ग कमी झाल्यानंतर अतिवृष्टीमुळे बाधीत, शेती, पशुधन, घरे, विद्युत यंत्रणा, रस्ते, पुल व अन्य सार्वजनिक मालमत्तांचे तात्काळ वस्तुनिष्ठ पंचनामे करावे. अतिवृष्टीबाधित एकही बाधित वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी, असे निर्देश पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी दिले. पालकमंत्री श्री. देसाई यांनी तांबवे पूल व कराडचे प्रितीसंगम येथील पूर परिस्थितीची पाहणी करून शासकीय विश्रामगृह कराड येथे तालुकास्तरीय अधिकाऱ्यांची बैठक घेतली यावेळी ते बोलत होते. या बैठकीला प्रांताधिकारी



अतुल म्हेत्रे,पोलीस उपअधीक्षक राजश्री पाटील, नगर परिषदेचे मुख्याधिकारी प्रशांत व्हाटकर, गट विकास अधिकारी प्रताप पाटील यांच्यासह विविध विभागांचे तालुकास्तरीय अधिकारी उपस्थित होते. जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीबाबत लवकरच मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांच्यासमवेत बैठक घेणार असल्याचे सांगून पालकमंत्री श्री. देसाई म्हणाले, धरणातील पाण्याचा विसर्ग व पाऊस कमी झाला असला तरी ग्रामसेवक, तलाठी, पोलीस पाटील व लाईनमन यांनी क्षेत्रीय स्तरावरच २४÷७ तास उपलब्ध राहावे. अतिवृष्टी व पुरामुळे ग्रामीण भागातील रस्ते, साकव पुलांचे नुकसान झाले आहे. याचे संबंधित विभागाने तातडीने पंचनामे करावेत. बऱ्याच ठिकाणी विद्युत पोल व विद्युत तारांचेही नुकसान झाले असून विद्युत वितरण कंपनीने त्याचेही पंचनामे करावे. पंचनामे पूर्ण झाल्यानंतर त्याचा अहवाल तातडीने शासनाकडे सादर करावा, अशा सूचनाही पालकमंत्री श्री देसाई यांनी केल्या.

## 'दिलखुलास' 'जय महाराष्ट्र' कार्यक्रम राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर यांची मुलाखत

**मुंबई । प्रतिनिधी**

महिलांच्या सशक्तीकरणासाठी आणि त्यांच्या हक्कांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र राज्य महिला आयोग सातत्याने कार्यरत आहे. त्याच धर्तीवर मुंबईत राष्ट्रीय पातळीवरील क्षमता बांधणी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या विषयाच्या अनुषंगाने राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांची विशेष मुलाखत माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित 'दिलखुलास'आणि 'जय महाराष्ट्र'या कार्यक्रमातून प्रसारित होणार आहे.

'दिलखुलास'कार्यक्रमातील ही मुलाखत शुक्रवार दि. २२ आणि शनिवार दि. २३ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवर तसेच 'छ्शुी जप खठ' मोबाईल ॲपवर ऐकता येणार आहे. तर 'जय महाराष्ट्र'कार्यक्रमातून ही मुलाखत शुक्रवार, दि. २२ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या अधिकृत समाजमाध्यमांवर प्रसारित होणार आहे. निवेदक दीपक वेलणकर यांनी ही मुलाखत घेतली आहे.

# मुख्यमंत्री सहायता निधीमुळे दुर्धर आजारांवर झाला उपचार

**यवतमाळ । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री सहायता निधी अनेक रुग्णांसाठी आधार ठरला आहे. जिल्ह्यात योजनेचा कक्ष सुरु झाल्यापासून हा निधी मिळविणे अधिक सोपे आणि कमी त्रासाचे झाले आहे. जिल्ह्यातील अनेक रुग्णांना या कक्षाचा लाभ झाला असून दोन रुग्णांच्या जटील शस्त्रक्रियांसाठी कक्षाच्या निधीने मोठा दिलासा दिला आहे.

सर्वसामान्य गरीब कुटुंबातील रुग्ण दुर्धर आजारांवर उपचार किंवा शस्त्रक्रिया करू शकत नाही. असे आजार झाल्यास त्यांना खरा प्रश्न पडतो, यासाठी येणारा खर्च करायचा कसा. अशा रुग्णांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष मोठा आधार देणारा ठरला आहे. अनेक रुग्णांना या कक्षाने वैद्यकीय मदतीचा हात दिला. गेल्या महाराष्ट्र दिनी जिल्हाधिकारी कार्यालयातच कक्ष सुरु झाल्याने रुग्णांना अधिक फायद्याचे ठरत आहे. यवतमाळ येथील जितेंद्र मनोहर श्रीवास हे ५० वर्षाचे नागरिक आहेत. त्यांच्या मेंदुत संसर्ग झाल्याने गेल्या अनेक दिवसांपासून ते नागपूर येथील मेयो रुग्णालयात भरती होते. त्यांना उपचारासाठी लागणाऱ्या खर्चाची चिंता होती. विविध ठिकाणी प्रयत्न करूनही त्यांना उपचारासाठी खर्चाची आवश्यक रक्कम जुळविता येत नव्हती. पानठेल्याचा व्यवसाय असल्याने त्यांचे उत्पन्नही जेमतेम होते. कोणत्याही योजनेतून आजारासाठी रक्कम मिळत नसल्याने त्यांना मुख्यमंत्री सहायता कक्षाबाबत समजले. त्यांनी लगेच अर्ज केला आणि त्यांना उपचारासाठी ५० हजार रुपयांची रक्कम तातडीने मंजूर करण्यात आली. या मदतीने ते आपल्या मेंदूतील संसर्गावर उपचार करु शकले.

झरी जामणी तालुक्यातील आंबेझरी या अतिशय दुर्गम गावातील विनोद मधुकर शिंदे यांना क्रॅनिक मायलॉइड ल्युकेमिया हा आजार होता. अनेक दिवसांपासून ते या आजाराशी झुंजत होते. वर्षाला यासाठी त्यांना बराच खर्च येत होता. मुख्यमंत्री सहायता कक्षास मदतीसाठी अर्ज केल्यानंतर त्यांना ५० हजार रुपयांचे सहाय्य उपचारासाठी मंजूर करण्यात आले. मुख्यमंत्री सहायता कक्षाच्या मदतीने आजारावर उपचार करता आले. हा कक्ष अतिशय चांगला असून रुग्णांना आधार देणारा असल्याचे या दोनही रुग्णांनी आपल्या प्रतिक्रिया व्यक्त करतांना सांगितले.

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • शुक्रवार, दि. २२ ऑगस्ट २०२५ • पान ४



*अंतरवली सराटी येथे शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर व जिल्हाप्रमुख गणेश भाऊ वरेकर यांनी संघर्ष योद्धे मा मनोज दादा जरांगे पाटील यांची सदिच्छा भेट घेतली व दि.२४ ऑगस्ट रोजी मांजरसुंभा येथे होणारी इशारा बैठक व २७ ऑगस्ट रोजी अंतरवली सराटी ते मुंबई आझाद मैदान होणाऱ्या रॅली व आंदोलना संदर्भात सविस्तर चर्चा या वेळी करण्यात आली.*

# नाकाबंदी करून इंडीगो कार पकडली; कारमध्ये मिळाला 4 किलो गांजा

## स्थानिक गुन्हे शाखा आणि नेकनूर पोलिसांची कारवाई



**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील अंमली पदार्थ विरोधी मोहिमेत स्थानिक गुन्हे शाखा आणि नेकनूर पोलिसांनी मोठी कारवाई करत एक इंडीगो कार पकडली. वाहनातून तब्बल ४ किलो १४० ग्रॅम गांजा हस्तगत करण्यात आला असून, या प्रकरणी एकाला अटक करण्यात आली आहे. जप्त मुद्देमालाची किंमत सुमारे ४ लाख ५० हजार रुपये इतकी आहे. बुधवारी दुपारी साडेतीनच्या सुमारास चाकरवाडी-डिघोळअंबा रोडवर ही कारवाई करण्यात आली. गोपनीय माहितीच्या आधारे पोलीस उपनिरीक्षक महेश विघ्ने यांच्या पथकाने नाकाबंदी केली असता पांढरी इंडीगो कार (क्र. चक-१४-एक-१४०३) थांबवली. तपासणीदरम्यान दत्ता मधुकर भोजणे (रा. वाघे, बाभुळगाव) हा आरोपी वाहनातून आढळून आला. कारमध्ये ४

► उर्वरित पान २ वर

# बीड जिल्ह्यात पतसंस्थांसाठी सायबर सुरक्षा आणि कर्जवसुलीवर विशेष प्रशिक्षण

**बीड । प्रतिनिधी**



आंतरराष्ट्रीय सहकार वर्षाच्या निमित्ताने, महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ मर्यादित पुणे आणि जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने बीड जिल्ह्यातील नागरी व ग्रामीण बिगरशेती सेवक सहकारी पतसंस्थांसाठी एका विशेष प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. हे प्रशिक्षण २० ऑगस्ट २०२५ रोजी तुळशी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, बीड येथे संपन्न झाले. या कार्यक्रमाचे उद्घाटन श्री. धनंजय डोईफोडे, सहनिबंधक (सेवानिवृत्त) तथा राज्य समन्वयक, एमसीडीसी पुणे यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून श्री. सतीश तोटावार, जिल्हा उपनिबंधक,

► उर्वरित पान २ वर

# अतिवृष्टी मुळे नुकसान झालेल्या शेतीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना तात्काळ नुकसान भरपाई द्यावा : भाऊसाहेब भवर

**पाटोदा । प्रतिनिधी**



पाटोदा तालुक्यात गेल्या आठवडाभरापासून सतत कोसळणाऱ्या पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक व नैसर्गिक हानी झाली आहे. शेतामध्ये पाणीच पाणी साचल्याने उभे पिके सडून हातची गेल्यात जमा झाली आहेत. त्यामुळे प्रशासनाने तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी अमळनेर जिल्हा परिषद गटाचे नेते भाऊसाहेब आण्णा भवर यांनी केली आहे. बीड जिल्ह्यातील पाटोदा तालुक्यात कुसळब, पिंपळवंडी, सुप्पा,वाहली चिखली, चिंचोली, सावरगाव घाट, सौताडा, घुलेवाडी,

► उर्वरित पान २ वर

# तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्या: महेश बेदरे

**• गेवराईतील सर्वच महसूल मंडळात अतिवृष्टी**

**गेवराई । प्रतिनिधी**



गेल्या आठ दिवसापासून राज्यामध्ये पावसाने हाहाकार माजवला आहे कसेबसे आलेले पीकही पावसाने हिसकावून घेतल्याने सणासुदीच्या तोंडावर संकट आले आहे अपेक्षित नसताना आलेल्या अतिवृष्टीने शेतकऱ्याचे चागंले आलेलं पीक कापूस, मूग, तूर, सोयाबीन पाण्यात गेले आहे.

गेवराई तालुक्यात गेल्या आठ दिवसापासून पावसाच्या सतत धारेने तालुक्यातील सर्वच महसूल मंडळात अतिवृष्टी झालेली आहे या अतिवृष्टी चे तात्काळ पंचनाने करून शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक मदत द्यावी आलेल्या अस्मानी संकटाने शेतकरी व्यतित झाला असून नगदी पीक असणारे मुग आणि सोयाबीन हाताचे गेलेले दिसत आहे सणासुदीच्या तोंडावर शेतकऱ्याचे निसर्गाने आलेले पीक हीसकावून घेतल्याने शेतकऱ्याला

► उर्वरित पान २ वर

# मनोज दादा जरांगे पाटील याच्या आरक्षण लढ्यात मुंबईला जाण्यासाठी धामणगाव गटातील सकल मराठा समाज्याने हजारोच्या संख्येने सहभागी व्हावे : विजय (आण्णा) गाढवे

**आष्टी । प्रतिनिधी**



मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी पोटतिडकीने सरकारकडे मांडून देखील वेळ काढू पणा होत असल्याने सकल मराठा समाज मनोज दादा जरांगे याच्या नेतृत्वाखाली २९ ऑगस्ट ला मुंबई ला जाणार आहे. या ऐतिहासिक लढ्याचे साक्षीदार होण्यासाठी धामणगाव गटातील सकल मराठा समाज्याने हजारोच्या संख्वेने सहभागी होण्याचे आवाहन सामाजिक कार्यकर्ते विजय (आण्णा) गाढवे यांनी केले आहे.मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी गेल्या अनेक वर्षांपासून संघर्षयोध्दा मनोज दादा जरांगे पाटील हे लढत आहेत. पण सरकार यातुन पळवाट काढून पुढचा ओढा दाखवत असल्याने मराठा समाजावर अन्याय होत आहे. लाखो मराठा युवक नोकरीविना आजही घरी बसून आहेत. आता मराठ्यांना आरक्षण मिळावे आणि मिळलेच पाहिजे. ही ठाम भुमिका घेऊन सरकारला घाम फोडण्यासाठी संघर्षयोध्दा मनोज दादा

► उर्वरित पान २ वर

# हुतात्मा स्मारकाचे काम रखडले गुत्तेदारावर प्रशासन मेहरबान; नागरिकांचा संताप, आंदोलनाचा इशारा

**पाटोदा । प्रतिनिधी**



पाटोदा नगरपंचायत हद्दीतील हुतात्मा स्मारकाचे काम गेल्या कित्येक वर्षांपासून रखडले आहे. स्मारक परिसराचा विकास करण्यासाठी नगर पंचायतने सिमेंट काँक्रीट रस्ता, नाली, शौचालय, पेव्हिंग ब्लॉक व लँडस्केपिंगची कामे भामेश्वर इन्फ्रा प्रा. लि. या गुत्तेदारास दिली होती. परंतु निविदा व करारनाम्यात स्पष्ट अटी असतानाही आजतागायत प्रत्यक्ष कामाला सुरुवात झालेली नाही. काम सुरू न झाल्याने स्मारक परिसरात कचरा, बांधकामाचे अवशेष, तसेच जनावरांचा वावर वाढला आहे. या दुर्दशेमुळे परिसराचे पावित्र्य हरवले असून, हुतात्म्यांचा अपमान होत असल्याची भावना नागरिकांमध्ये प्रबळ झाली असून हे काम न करता मुद्दाम विलंब करत असून काम न करता फक्त कागदोपत्री दाखवून बिले वसूल करण्याचा प्रयत्न सुरू आहे, असा थेट आरोप नागरिकांनी केला आहे.काम वेळेत पूर्ण न केल्यामुळे गुत्तेदारावर दंडात्मक कारवाई करून काळ्या यादीत टाकणे अपेक्षित होते. मात्र अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. उलट प्रशासनाने

► उर्वरित पान २ वर

# पिंपळनेरच्या शेतकऱ्यांना लागली बैलपोळ्याची आतुरता

**पिंपळनेर । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांचा सण असलेला 'बैलपोळा' आल्याने पिंपळनेर येथे भरणाऱ्या आठवडे बाजारात बैलांच्या साजाची दुकाने मोठ्या प्रमाणात थाटलेली दिसली. बैल हा शेतकऱ्यांचा जोडीदार असून वर्षभर इमाने इतबारे तो शेतात राबतो. त्याच्या या ऋणातून उतराई होण्यासाठी पोळ्याच्या दिवशी बैलाची रंगरंगोटी व सजावट करून बैलांची पुजा केली जाते. त्याचे खांदे तुप, हळदीने शेकले जातात. गरम पाण्याने त्याला अंघोळ घातली जाते. बैलांना शृंगार जढवून सायंकाळी मारूती मंदिराची प्रदक्षिणा करून बैलांची मिरवणूक काढली जाते. सध्यस्थितीत ट्रॅक्टरची संख्या वाढली असून बैलांच्या संख्येत मोठी घट झाल्याचेही वास्तव आहे. शुक्रवार दि. २२ ऑगस्ट रोजी बैलपोळा असल्याने येथील आठवडे बाजारात गुरुवार रोजी मोठ्या प्रमाणात बैलांच्या साजाची दुकाने लावण्यात आली होती. येथे पावसाने बऱ्याच दिवसांपासून दडी मारली होती, मात्र व दोन ते तीन दिवसांपासून काही प्रमाणात बऱ्यापैकी

► उर्वरित पान २ वर

# लिंबागणेश येथे गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शांतता कमिटीची बैठक संपन्न

## शिस्त आणि सौहार्दात शांततेत सण साजरे करण्याचे आवाहन

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

आगामी गणेशोत्सव व ईद ए मिलाद सण आनंदात व शांततेत साजरे व्हावेत यासाठी ग्रामस्थांनी कायदा व सुव्यवस्था तसेच सामाजिक सलोखा अबाधित ठेवावा, असे आवाहन नेकनूर पोलिस स्टेशनचे प्रभारी पोलिस निरीक्षक चंद्रकांत गोसावी यांनी केले. आज दि.२१ गुरूवार रोजी बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील ग्रामपंचायत कार्यालयात आयोजित शांतता कमिटीच्या बैठकीत अध्यक्षस्थानी बोलत होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. गणेश ढवळे यांनी तर आभारप्रदर्शन समीर शेख यांनी केले.गणेशोत्सव शांतता कमिटीच्या बैठकीस पोलिस उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे, सहाय्यक फौजदार बाबासाहेब राख, गोविंद बडे, बालासाहेब ढाकणे,सरपंच बालासाहेब जाधव, राजाभाऊ गिरे, कल्याण वाणी, बाळकृष्ण थोरात, चिंतामण जोशी,वरद जोशी, श्रीहरी निर्मळ,दामु थोरात, शिवाजी वाणी, पांडुरंग वाणी,समीर शेख, रमेश गायकवाड, समीर शेख, बाळासाहेब मोरे, विक्रांत वाणी, अभिजित गायकवाड, अशोक वाणी, संतोष भोसले, सुरेश ढवळे,बाळासाहेब मुळे, तुळशीराम गायकवाड,विठ्ठल कदम,अकबर सय्यद,अक्षय येडे, शिवाजी शिंदे,बंडु बागल,जीवन मुळे,

► उर्वरित पान २ वर



## थोडक्यात...

### भव्य अमृत मेळाव्याचा तरुणांनी लाभ घेण्याचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

माजलगाव येथे दि. २३ ऑगस्ट रोजी भव्य 'अमृत मेळावा'शिक्षण, कौशल्य आणि व्यवसाय संधींचा अद्वितीय संगम माजलगाव (जि. बीड) –महाराष्ट्र संशोधन उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) संस्थेच्या वतीने शनिवार, २३ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १० वाजता वैष्णवी मंगल कार्यालय, गजानन मंदिर रोड, माजलगाव येथे भव्य 'अमृत मेळावा व परिसंवाद सत्राचे' आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात ब्राह्मण, मारवाडी, आर्य वैश्य (कोमटी), गुजराती, राजपूत, माहेश्वरी, राजपुरोहित, सिंधी, बनिया, बंगाली, पाटीदार आदी खुल्या प्रवर्गातील समाजासाठी अमृत संस्थेच्या विविध शैक्षणिक, कौशल्य विकास आणि उद्योग उभारणीसाठीच्या योजनांची माहिती व मार्गदर्शन दिले जाणार आहे.मेळाव्यात णझडउ/चझडउ पूर्व परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी प्रोत्साहन अर्थसहाय्य, खखढ, खखच्, खखचड, खखखढ सारख्या उच्च शिक्षण संस्थांसाठी सहाय्य, खत्रढ्ठ, उखझएढ, छखएडखढ, उ–ऊ यांसारख्या जागतिक दर्जाच्या संस्थांचे कौशल्य विकास कोर्सेस पूर्णपणे विनामूल्य, व्यक्तिमत्त्व विकासासाठी चघउड़ चा अमृत कलश कोर्स व किशोर विकास उपक्रम, तसेच तरुणांसाठी बेकरी, सुर्यमित्र,इम्पोर्ट–एक्स्पोर्ट यांसारखी उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत. याशिवाय व्यवसाय कर्जावर व्याज परतावा या योजनांचा लाभही मिळणार आहे. विशेष म्हणजे, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (चउएऊ) मार्फत अमृतच्या लाभार्थ्यांना मोफत स्वयंरोजगार प्रशिक्षण उपलब्ध होणार असून त्यासाठी नोंदणी व मार्गदर्शन या मेळाव्यात केले जाईल. याशिवाय लहानात लहान स्वदेशी उत्पादन व सेवा जगभर पोहोचविण्यासाठी अमृत पेठ या महत्वाकांक्षी उपक्रमाची माहिती व नोंदणीही या मेळाव्यात होणार आहे.या कार्यक्रमास अमृत संस्थेचे विशेष कार्यकारी अधिकारी प्रवीण पांडे, माजलगावचे तहसीलदार संतोष रुईकर व राज्य समन्वयक दीपक जोशी उपस्थित राहणार आहेत. हा मेळावा शिक्षणापासून व्यवसायापर्यंत आत्मनिर्भरतेकडे नेणारे एक भक्कम पाऊल ठरणार असून खुल्या प्रवर्गातील तरुणांसाठी ही सुवर्णसंधी आहे. समाजातील सर्व नागरिक व तरुणांनी या मेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन अमृतचे जिल्हा व्यवस्थापक विशाल अशोकराव जोशी यांनी केले आहे.

### जिल्हा क्रीडा पुरस्कार सन २०२३-२४ साठी अर्ज सादर करण्याचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे अतंर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद, बीड मार्फत जिल्हयातील गुणवंत क्रीडापटु गुणवंत क्रीडा मार्गदर्शक यांच्या कार्याचे, योगदानाचे मुल्यमापन होउन त्यांचा गौरव व्हावा व प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने शासनातर्फे २०२३–२४ करीता जिल्हा क्रीडा पुरस्कार नियम जिल्हयातील ०१ गुणवंत क्रीडा मार्गदर्शक व गुणवंत खेळाडू (०१ पुरूष ०१ महिला व ०१ दिव्यांग खेळाडू) असे एकुण ०४ पुरस्कारासाठी अर्ज मागविण्यात आहेत. २०२२ नुसार सन २०२३–२४ च्या जिल्हा क्रीडा पुरस्कारासाठी दि. ०१ जुलै २०२३ ते ३० जून २०२४ या कालावधीसाठी खेळाडूची मागील पाच वर्षाची कामगिरी व क्रीडा मार्गदर्शकासाठी मागील दहा वर्षाची कामगिरी विचारात घेतली जाईल.

### बीज भांडवल योजनेसाठी बेरोजगार युवक युवतींनी अर्ज सादर करावेत

**बीड । प्रतिनिधी**

विशेष घटक योजना (२०२५–२०२६ मध्ये साध्य झालेले लक्ष्य ८० लाभार्थी) स्वरूप:– प्रकल्प मर्यादा रु. ५००००/– पर्यंत.प्रकल्प मर्यादेच्या ५० टक्के पर्यंत अनुदान देण्यात येते व राहिलेली ५० टक्के रक्कम बँके मार्फत देण्यात येते. उदा. (२५ हजार अनुदान २५ हजार बँक रक्कम बँक कर्जावर बँकेच्या नियमा प्रमाणे व्याज आकारण्यात येते. कर्जाची परतफेड सर्वसाधारणपणे ३ वर्षात करण्याची आहे. बियाणे भांडवल योजना (२०२५–२०२६ उदिष्ट ८० लाभार्थी स्वरुप प्रकल्प मर्यादाः ०५ लाखापर्यंत प्रकल्प मर्यादेच्या २० टक्के बीजभांडवल कर्ज महामंडळामार्फत ४ टक्के द.सा.द.शे. व्याज दराने देण्यात येते. सदर राशीमध्ये महामंडळाचे अनुदानाचा रु. १०,०००/– चा समावेश आहे. बँकेचे कर्ज ७५ टक्के देण्यात येते व सदर कर्जावर बँकेच्या नियमाप्रमाणे व्याज दर आकारण्यात येतो. महामंडळाचे व बँकेच्या कर्जाची परतफेड एकाच वेळेस ठरवुन दिलेल्या समान मासिक हप्त्यानुसार तीन ते पाच वर्षाच्या आत करावी लागते. अर्जदारास ५ टक्के स्वतः चा सहभाग भरावयाचा आहे. थोडक्यात बँक रक्कम ७५ टक्के महामंडळ २० टक्के व अर्जदाराचा सहभाग ५ टक्के एकुण १०० टक्के ारहरवळीहर.ालिलवल.ळप या संकेतस्थळावर ऑनलाईन (जपश्रळपश) कर्ज मागणी अर्ज उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. तरी इच्छुक अर्जदारांना महामंडळाकडून खालीलप्रमाणे अर्जदारांनी त्यांचे स्वतः चे (ए–चरळश्र) ई मेल अकाउंट वापरुन ऑनलाईन (जपश्रळपश) पध्दतीने अर्ज करावा व अर्जाची मुळ प्रत व आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती जिल्हा कार्यालयात स्वतः सादर करावी.